**कृपया प्रसिद्धीसाठी** **२१ मार्च २००९**

## देशाच्या विकासासाठी परिवर्तन करुया
## राम नाईक यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**मुंबई, रविवार**: "शासकीय पातळीवर समाजाच्या विकास कार्यांचा वेग मंदावला आहे, महागाई आपल्या सर्वोच्च स्तरापर्यंत पोहोचली आहे. मंदी, बेरोजगारी, आतंकवाद, उपनगरीय प्रवाश्यांचे प्रश्न, गोरेगांव ते दहिसर या परिसरात खाजगी वनभूमिवर राहणा-या नागरिकांची समस्या आदि विविध स्तरांवरील समस्यांची सोडवणूक करण्यात कॉंग्रेस सरकार अयशस्वी झाली आहे. या समस्यांचे जर समाधान करायचे असेल तर समाजाच्या विकासाची गती वाढविण्याची गरज आहे आणि त्यासाठी परिवर्तन हाच एकमेव उपाय आहे. यासाठी भाजपा-शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार ध्यावा", असे आवाहन उत्तर मुंबई भाजपा तर्फे बोरीवली आणि मालाड मध्ये आयोजित भाजपा-शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या संमेलनात श्री राम नाईक यांनी केले.

"भारतीय जनता पार्टी-शिवसेना दोघांनीही प्रत्येक मतदान केंद्रातील थेट बूथ पर्यंत समिती स्थापन करुन कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले आहे. या सर्वांच्या कामाला गती देऊन जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचूया", असे यावेळी शिवसेना विभागप्रमुख श्री. विनोद घोसाळकर म्हणाले. ही निवडणूक जिंकून आपलं सरकार तर आणूयाच परंतु देशात सर्वाधिक मताधिक्य उत्तर मुंबईत मिळवून दाखवुया," असे आवाहन यावेळी भाजपा-मुंबईचे अध्यक्ष श्री. गोपाळ शेट्टी यांनी कार्यकर्त्यांना केले.

बोरीवली आणि मालाड या दोन्हीं जागांवर एकाच वेळी संमेलन आयोजित करण्यात येऊनही दोन्हीकडे मोठ्या प्रमाणात कार्यकर्ता व पदाधिकारी संमेलनात सहभागी झाले होते. या प्रसंगी उत्तर-मुंबई भाजपा अध्यक्ष श्री योगेश सागर, महाराष्ट्र भाजपा चे उपाध्यक्ष आणि आमदार श्री विजय भाई गिरकर आदीची भाषणे झाली. सर्वश्री जयप्रकाश ठाकूर, रमेश मेढेकर, अतुल भातखळकर, हैदर आझम, मोहन मिठबावकर, प्रवीण शहा, भारती केणी, भालचंद्र म्हात्रे, विजय वालावलकर, शोभा पानसरे, हंसाबेन देसाई, शर्मिला शिदे, मधुकर राऊत, श्रीधर शेलार, रेणुका शिंदे, सौ. गीता चाफेकर, गंगाराम जमनानी, आर.यु. सिंह, शैलजा गिरकर, भाई गिरकर, ज्ञानमूर्ति शर्मा, राम बारोट आदि युती चे प्रमुख पदाधिकारी देखील संमेलनाला हजर होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिद्धी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**